# "रक्तदान म्हणजे श्रेष्ठदान"
# "रक्तदान आहे जीवनदान कारण त्यामुळे वाचतात अनेकांचे प्राण"

या विषयाला अनुसरुन अमरावती येथील सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षक दिनाच्या निमित्याने दिनांक ५ सप्टेंबर २०११ रोजी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या प्रारंभी डॉ. संजय खेरडे यांच्याव्दारे दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाला विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. मळसने, रासेयो अधिकारी प्रा. योगेश गुल्हाने, प्रा. संगीता गुडधे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. योगेश गुल्हाने यांच्याव्दारे करण्यात आले. रक्तदानाचे महत्व सांगुन रक्तदान हेच जीवनदान आहे असे ते म्हणाले. रक्तदानाचे महत्व लक्षात घेऊन मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी रक्तादान शिबिरामध्ये सहभाग घेतला. शिबिरामध्ये रक्तदानातुन जमा झालेल्या रक्तबाटल्यांची संख्या जवळपास १५० होती. जी रक्तबाटल्यांची संख्या नसुन समाजाला एक नवीन ज्योत देणारी आहे. अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी आणि सदस्य यांच्या देखरेखीखाली रक्तदान शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यात आला.




राष्ट्रीय सेवा योजना
NSS